

# -: अमृत विचारांचे तत्वज्ञानी :-

# -: संतश्रेष्ठ श्री. ज्ञानेश्वर महाराज :-

जगाच्या कल्याणाचे काव्य लिहिणारे सर्वश्रेष्ठ कवी 'संत ज्ञानेश्वरांचा महराष्ट्र'. ही महाराष्ट्राची सर्वदूर ओळख आहे. खऱ्या अर्थाने साधुसंतांची पवित्र भूमी म्हणून महाराष्ट्राचा नावलौकिक आहे.

''जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती । देह झिजवती उपकारे ।।''

अशी संतांची महती गाणाऱ्या महाराष्ट्रामध्ये संत ज्ञानेश्वर यांनी सुमारे साडेसातशे वर्षांपूर्वी आपल्या दैवी प्रतिभेचे देणे लाभलेल्या सिद्धहस्त लेखणीतून भावार्थदीपिका, अमृतानुभव, हरिपाठ, अभंग, ओव्यांचे विपुल लेखन केले. त्यांनी केलेल्या अमृतमय रचनांच्या माध्यमातून सर्वसामान्य माणसाला हृदयस्थ असणाऱ्या ईश्वरापर्यंत पोहोचण्याचा मार्ग दाखविला. कोणत्याही रुढी परंपरा व कर्मकांडाला महत्त्व न देता केवळ नामस्मरणाने आपण ईश्वराला साध्य करू शकतो. आपल्या जीवनाचे खऱ्या अर्थाने कल्याण करू शकतो, असा सरळ सोपा मार्ग ज्ञानेश्वरांनी सकलांना दाखविला. अवघ्या एकोणीस वर्षांच्या आयुष्यात त्यांना जीवनाचा अर्थ उमजला. तो आपल्या तत्त्वज्ञानाच्या माध्यमातून जगाला सांगितला. ''जो जे

वांछील, तो ते लाहो, प्राणीजात ।। अशी विश्व कल्याणाची उदात्त भावना घेऊन पसायदानाची (प्रार्थना) रचना करून त्यांनी वैश्विक विचार'' जगाला दिल्याचे दिसून येते.

आजच्या भौतिक प्रगत युगामध्ये वावरताना नमस्कार, रामराम वगैरे शब्दांचा वापर करून एकमेकाला भेटत असतात. मात्र समोरच्या माणसांमध्ये ईश्वर आहे. आपल्याही अंतरी ईश्वराचाच अंश आहे ही भावना जाणून 'राम कृष्ण हरी' म्हणून परस्परांचे स्वागत किंवा आदर व्यक्त करण्यासाठीचा महामंत्र देखील संत ज्ञानेश्वरांनीच आपल्याला दिलेला आहे. संत ज्ञानेश्वर हे निगर्वी, संयमी होते. त्यांना विद्वत्तेचा अजिबात गर्व नव्हता. समाजमनातील गर्वाची भावना दूर व्हावी यासाठी त्यांनी रसाळ ओव्यांद्वारे प्रयत्न केले. अगदी विद्वत्तेचा गर्व झालेल्या चांगदेवांना उपदेश करताना त्यांनी अत्यंत परखड भाषेमध्ये ओव्या स्वरूपात पत्र लिहून चांगदेवांना उपदेश केला.

आधुनिक लोकशाहीचा पाया देखील संत ज्ञानेश्वर यांनीच घातला हे निर्विवाद स्विकारले पाहिजे. संत ज्ञानेश्वरांच्या समकालीन संत गोरोबाकाका, संत नरहरी सोनार, संत चोखामेळा, संत सावता माळी, संत नामदेव यांच्यासह अनेक संत जातीभेद-लिंगभेद विसरून एकत्र आले. खऱ्या अर्थाने संतांनी समता-समानतेचा विचार समाजामध्ये कृतीशीलपणे रुजविला. या संतांचे नेतृत्व ज्ञानेश्वरांनीच केल्याचा इतिहास आहे. संत ज्ञानेश्वरांचे आराध्य दैवत होते विठ्ठल-रुक्मिणी.

भागवत धर्माची पताका घेऊन महाराष्ट्रासह देशाच्या कानाकोपऱ्यातून वारकरी समानता स्विकारुन भक्तीत तल्लीन होऊन पंढरपूरला जात असतात. त्या भागवत धर्माच्या समृद्ध परंपरेचा पाया देखील संत ज्ञानेश्वरांनीच घातला. पंढरपूरला जाणारे भाविक-भक्त तितक्याच निर्मळ मनाचे असतात. सर्वसामान्यांचे आराध्य दैवत असणारा विठ्ठल भीमातीरी कटेवर हात ठेवून उभा आहे. कटेवर हात ठेवलेला मनुष्य हा चिंतामुक्त मानला जातो. अशा विठ्ठलाच्या भक्तीचा महामंत्र ज्ञानेश्वरांनी सकलांना दिला. साध्या भोळ्या विठ्ठलाची भक्ती करताना अबाल-वृद्ध, स्त्री-पुरुष थकत नाहीत. कोणत्याही प्रकारच्या कर्मकांड व विधी उपचारांची त्यांना गरज असत नाही. केवळ नामस्मरणानेही पांडुरंग भेटतो. अशी सर्वसाधारण भक्ताची अनुभूती आहे. म्हणूनच श्रद्धेने पंढरपूरला जाणाèयांमध्ये भेदाभेद पाहायला मिळत नाही. किंबहुना विठ्ठल भक्तीमध्ये रमणारांसाठी 'भेदाभेद अमंगळ' असा संत विचार किमान महाराष्ट्रात तरी जपला जातो. रंजल्या गांजलेल्यांची सेवा करणे. त्यांना माणुसकीने वागवणे. हा संत विचार ज्ञानेश्वरांच्या महाराष्ट्राने अवघ्या जगाला दिला आहे, असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही.

संत ज्ञानेश्वरांचे महाराष्ट्राच्या जडणघडणीतील योगदान मोठे आहे. त्यांनी भगवद्गीतेचा अत्यंत रसाळ आणि सरळ-साध्या भाषेमध्ये अनुवाद करून सकलांना गीता

सांगितली. ज्ञानेश्वरांना आद्य अनुवादक म्हणून म्हणता येईल. त्यांनीच भगवद्गीता मराठीमध्ये अनुवादित केली. म्हणूनच आज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात ज्ञानेश्वरी पारायणे केली जातात. भगवद्गीतेच्या अनुवादाचे वाचन केले जाते. चिंतनातून समाजाची जडणघडण होण्यास मदत मिळत आहे. संत ज्ञानेश्वरांनी निर्माण केलेला संत सांप्रदाय विचारात घेता सांप्रदायांमध्ये रमलेली व्यक्ती एकमेकाला 'माऊली' नावाने संबोधतात. 'माऊली' या शब्दाचा अर्थ 'आई'. 'आई' मध्ये विश्वव्यापक वात्सल्य, माया-ममता आणि प्रेम सामावलेले आहे. तोच प्रेमाचा संदेश वारकरी पदोपदी देत असतात. वारकऱ्यांच आराध्य दैवत असणाऱ्या विठ्ठलभक्तीची परंपराही ज्ञानेश्वरांनी निर्माण केली. जगद्गुरु तुकाराम महाराज व संत ज्ञानेश्वर यांनी महाराष्ट्रावर विचारांचे जे शिंपण केले आहे त्याचमुळे महाराष्ट्र आज खऱ्या अर्थाने व्यापकदृष्ट्या समृद्ध दिसत आहे. ज्ञानेश्वरांच्या चमत्कारांची चर्चा करण्यापेक्षा ज्ञानेश्वरांनी जो विचार दिला. जो समतेचा पाया घातला त्या वाटेवरून आम्ही सर्वांनी चालत राहण्याचा केलेला निर्धार हा प्राणपणाने जपला पाहिजे.

- सौ. रुपाली तोडकर.

व्यक्तिरेखा -

१. संत ज्ञानेश्वर - श्री. निखील पेंढारकर.

नेपथ्य -

१. श्री. शंतनू देशमुख.
२. श्री. अद्वैय मुंढे.
३. श्री. आनंद पंडित.
४. श्री. गिरीश कुलकर्णी.
५. श्री. सर्वेश उमराणी.
६. श्री. गणेश गायकवाड.
७. श्री. अनुप गरगटे.
८. श्री. आशुतोष गोळे.
९. श्री. ओमकार पाटील.
१०. श्री. आनंद पंडित.

लोकेशन -

मोरघळ, सातारा

रंगभूषा -

श्री. गणेश सावंत.

वेशभूषा -

१. सौ. आसावरी पंडित.

२. श्री. गणेश सावंत.

छायाचित्रण -

श्री. कल्पेश पाटसकर.

लायटिंग विभाग -

१. श्री. गणेश गायकवाड.

२. श्री. अनुप गरगटे.

३. श्री. आशुतोष गोळे.

४. श्री. सर्वेश उमराणी.

५. श्री. अद्वैय मुंढे.
६. श्री. ओमकार पाटील.

फोटो एडिटिंग -

१. श्री. राजेंद्र बिळासकार.

चित्र (स्केच) -

१. अद्वैय मुंढे.

लेखन विभाग -

- लेखन विभाग प्रमुख - श्री. राजेंद्र आलोणे.
- लेखन - सौ. रुपाली तोडकर.
- लेख संकलन - श्री. दीपक आफळे

- ध्वनीमुद्रण - सौ. अवंती कुलकर्णी.
- ध्वनिमुद्रिका -